**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०६/२०२६ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश.**

**CNR NO. MHSN070001242026**

प्रस्तुतचा अर्ज मुंबई विनीयमन अधिनियम, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचे पती कै. प्रकाश तुकाराम वावरे यांचे दि. २०.०१.२०२६ रोजी निधन झाले आहे. कै. प्रकाश तुकाराम वावरे हे एमएसईबी येथे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून नोकरीस होते. बनेवाडी येथे त्यांची घरमिळकत व शेतमिळकत आहे. मयत प्रकाश यांना अर्जदार क्र.१ प्रतिक प्रकाश वावरे-मुलगा, अर्जदार क्रमांक २ आकाश प्रकाश वावरे-मुलगा व अर्जदार क्र. ३ श्रीमती पार्वती प्रकाश वावरे-पत्नी या नात्याने सरळ व कायदेशिर असे वारस आहेत. अर्जदार क्र. १ यांना मयत प्रकाश यांच्या जागेवर एमएसईबीमध्ये अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी व इतर शासकीय निमशासकीय कामी नावे नोंदी करण्यासाठी सदरच्या दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत प्रकाश यांचे कायदेशिर वारस असलेबाबत वारसा दाखला मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. त्याप्रमाणे जाहीर प्रकटण-उद्घोषणा (नि.क्र.१३) पाठवण्यात आली होती. जाहीर नोटीस (नि.क्र.११) सुध्दा दैनिक लोकशाही या वर्तमानपत्रात दिनांक १९.०२.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

३. अर्जातील कथन विचारात घेता खालील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विचाराधीन बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत प्रकाश तुकाराम वावरे यांचे वारस आहेत काय ? | होकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा.

विचाराधीन बाबी क्रमांक १ बाबत -

४. अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ अर्जदारांनी अर्जदार क्र.१ प्रतिक प्रकाश वावरे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१४ वर दाखल करुन पुरावा बंद पुरसिस नि.क्र.१५ दाखल केली आहे.

५. अर्जदार यांनी प्रकाश तुकाराम वावरे यांचे मृत्युप्रमाणपत्र नि.क्र.७ वर हजर केलेले आहे.

६. नि.क्र.७ वर दाखल असलेल्या मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता प्रकाश तुकाराम वावरे हे दि. २०.०१.२०२६ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र.१ यांनी सरतपासात कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत प्रकाश तुकाराम वावरे यांचे सरळ व कायदेशिर वारस आहेत.

७. अर्जदार यांनी उद्घोषणा व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर त्याबाबत आक्षेप घेण्यास कोणीही हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचा पुरावा हा विना आव्हानीत राहिला आहे.

८. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत प्रकाश तुकाराम वावरे यांचे कायदेशिर वारस असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ हे मागणीप्रमाणे वारसा दाखला मिळण्यास पात्र आहेत. यास्तव विचाराधीन बाब क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येत आहे. तसेच विचाराधीन बाब क्रमांक २ करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ प्रतिक प्रकाश वावरे-मुलगा, अर्जदार क्रमांक २ आकाश प्रकाश वावरे-मुलगा व अर्जदार क्र. ३ श्रीमती पार्वती प्रकाश वावरे-पत्नी हे मयत प्रकाश तुकाराम वावरे यांचे मुंबई विनीयमन अधिनियम, १८२७ चे कलम ३ व ४ च्या तरतुदीनुसार मान्यताप्राप्त वारस आहेत.

३. सदरचे वारस प्रमाणपत्र विहीत न्यायालयीन शुल्क स्वीकारुन देण्यात यावे.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.07.21 08:49:32 +0530

दिनांक २१.७.२०२६.

(श्रीमती एन एस कदम )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कवठेमहांकाळ.

कवठेमहांकाळ

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P. Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 21.7.2026
Order signed by the
Presiding Officer on -21.7.2026
Order uploaded on 21.7.2026